दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १८ वे, अंक ११० वा | मंगळवार, दि. २८ नोव्हेंबर २०२३ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

## दरवर्षी ४ हजार अभियंते नोकरीसाठी सोडून परजिल्ह्यात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व 'बाटू' अंतर्गत प्रत्येकी सात अभियांत्रिकी महाविद्यालये सोलापुरात आहेत. त्या महाविद्यालयांमधून दरवर्षी जवळपास पाच हजार विद्यार्थी अभियांत्रिकीची पदवी पूर्ण करतात. मात्र, त्यांची अपेक्षापूर्ती होईल असा रोजगार, जॉब मिळत नसल्याने दरवर्षी अंदाजे चार हजार अभियंते नोकरीसाठी सोलापूर सोडून परजिल्ह्यात जातात ही वस्तुस्थिती आहे. एकाचवेळी राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री एकाच जिल्ह्यातील अशी ओळख सोलापूरची आहे. सोलापूर हा रब्बीचा व दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखला जातो. तरी, राज्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत सर्वाधिक ४५हून अधिक साखर कारखाने सोलापुरात आहेत. जिल्ह्यातील चिंचोली (ता. मोहोळ) या औद्योगिक वसाहतीतील जागा हाऊसफुल्ल झाल्याची स्थिती आहे. अक्कलकोट रोड एमआयडीसीतही अशीच स्थिती आहे.

माफक दरात प्रमाणपत्रासहीत कोर्स
अंबिका फॅशन डिझाइनिंग & टेलरिंग क्लासेस
- फॅशन डिझाइनिंग – एक वर्ष
- ब्लाउज डिझाइनिंग – तीन महिने
- ड्रेस डिझाइनिंग – तीन महिने
- वन पीस डिझाइनिंग – तीन महिने
- काष्ठा नऊवारी साडी ■ आरी वर्क
संपर्क – दीपा भोसले ७७५६८२०१२३

# राज्यभरात अवकाळी पावसाचा तडाखा

## पाऊस आणि गारपिटीमुळे पिकांचं मोठं नुकसान







**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** अवकाळीच्या संकटामुळे शेतकऱ्यांच्या अश्रूंचा बांध पुन्हा फुटला आहे. पुन्हा एकदा अवकाळीनं अनेक भागांत अवकृपा केली आहे. रात्री झालेल्या पावसामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांमधील पिके जमीनदोस्त झाली. पुणे, अहमदनगर, नंदुरबार, वाशिम, नाशिक, नांदेड जिल्ह्यात अवकाळी पावसामुळं मोठं नुकसान केलं आहे. दरम्यान, पुण्यातल्या आंबेगावात गारपिटीचा जोरदार तडाखा बसला आहे. कांदा आणि बटाटा पिकांचं मोठं नुकसान झाले आहे. तर निफाडमध्येही गारपिटीनं झोडपलं, द्राक्ष पिकांना मोठा फटका बसला आहे. हवामान विभागानं दिलेल्या अंदाजानुसार आजही राज्यात अवकाळी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. आज राज्यात अनेक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज आहे.

हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार हिंगोली जिल्ह्यांमध्ये रात्री जोरदार स्वरूपाचा अवकाळी पाऊस बसला आहे ढगाच्या सह बरसलेल्या पावसामुळे शेतातील कापसाच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे हिंगोली जिल्ह्यांमध्ये कापूस उत्पादक शेतकरी या रात्रीच्या पावसामुळे चांगले संकटात सापडले आहेत कारण व्यसनीला आलेला कापूस या पावसामुळे पूर्णपणे भिजला आहे सुरुवातीपासूनच पाऊस काळ कमी कमी होता पावसाने मारलेली दडी या परिस्थितीत शेतकऱ्यांनी कापसाचे पीक जोपासली होती परंतु रात्री झालेल्या पावसाने शेतकऱ्याच्या हातात तोंडाशी आलेला घास हिरावला आहे.

### पुण्यात आंबेगाव तालुक्यातील बहुतांश गावात गारपिटीचा तडाखा

पुण्यातील उत्तर भागात काल अवकाळी पावसाने चांगलेच झोडपून काढले. आंबेगाव तालुक्यातील बहुतांश गावात गारपिटीचा तडाखा बसलाय. कालची गारपीटीची दृश्य आता समोर आलेली आहे. लोणी, धामणी, खडकवाडी गावातील शेतकऱ्यांच्या कांदा रोपांचे नुकसान झालंय. तर काही भागात बटाटा पिकाला काही प्रमाणात फटका बसलाय.

### हिंगोलीत कापसाला मोठा फटका

हिंगोली जिल्ह्यांमध्ये रात्री जोरदार स्वरूपाचा अवकाळी पाऊस बसला आहे. शेतातील कापसाच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. हिंगोली जिल्ह्यांमध्ये कापूस उत्पादक शेतकरी या रात्रीच्या पावसामुळे चांगले संकटात सापडले आहेत. कारण वेचणीला आलेला कापूस या पावसामुळे पूर्णपणे भिजला आहे.

### वादळी वाऱ्यासह गारांच्या पावसाने पारनेरला झोडपले

अहमदनगर जिल्ह्याला काल अवकाळी पावसाने झोडपले आहे. वादळी वाऱ्यासह गारांच्या पावसाचा पारनेर तालुक्याला सर्वाधिक फटका बसला आहे. पारनेर तालुक्यात कांदा, टोमॅटो, मका, ज्वारी तसेच फळबागांना फटका बसला आहे. पारनेरच्या पानोली, जवळा, निघोज या गावांमध्ये गारांचा मोठा फटका बसला आहे. यामध्ये शेतकऱ्यांचे झालेल्या नुकसानीचे पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार निलेश लंके यांच्यानी सकाळी पाहणी केली.दरम्यान शासनाने तातडीने या नुकसानीची पाहणी करून पंचनामे करावेत अशी मागणी केली.

### कांद्याचे मोठे नुकसान

उन्हाळा कांदा संपून आता लाल कांदा बाजारात यायला सुरुवात झालेली असतांना आज अवकाळी पाऊस व गारपिटीने पुन्हा एकदा चांगलेच झोडपल्याने कांद्याचे मोठे नुकसान झाले आहे. गेल्या तीन महिन्यापासून दुष्काळाची परिस्थिती असतांना कांद्याची लागवड करून वाढवण्यात आला होती. शेतातून कांदे काढायचे अन बाजारात विकायचे अशी परिस्थिती असतांना अवकाळी पाऊस व गारपिटीने आज शेतकऱ्याचा कांद्यावर घाला घातला.या गारपिटीमुळे शेतातील कांदा सडून शेतकऱ्याच्या हाती काहीच शिल्लक राहणार नाही.त्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी हतबल झाला आहे. दरम्यान, गारपिटीमुळे लाल कांद्याचे उत्पादन कमी होऊन भविष्यात पुन्हा ' कांदा ' टंचाई निर्माण होणार आहे.

### 20 ते 25 हजार क्विंटल मिरची पाण्यात

आवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका नंदुरबारमधील मिरची खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांना बसला आहे. शेतकऱ्याकडून खरेदी केलेली जवळपास 20 ते 25 हजार क्विंटल मिरची पाण्यात भिजल्याने खराब होण्याची शक्यता आहे. पावसात भिजल्याने 30 टक्के मिरची खराब होण्याचा अंदाज आहे. दोन ते तीन कोटी रुपयाचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

## हत्तूरमध्ये गॅसचा मोठा स्फोट

### चौघे गंभीर जखमी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राहत्या घरी गॅसवरची शेगडी पेटवता असताना अचानक मोठा स्फोट होऊन चौघे गंभीररित्या भाजले. सोमवारी सकाळी ६ च्या सुमारास शहरापासून जवळच असलेल्या दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तूर येथे ही दुर्दैवी घटना घडली.

यामध्ये एक महिला, दोन लहान मुलं आणि वृद्धाचा समावेश आहे. जखमींना तातडीने येथील शासकीय रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सोनाली महादुलिंग बबुरे (वय- २८), आरुषी महादूलिंग बबुरे (वय ३), मलकारीसिद्ध सिद्धप्पा बबुरे (वय- १) आणि शावरसिद्ध सिद्धप्पा बबुरे (वय- ७०, सर्व रा. हत्तूर, ता. द. सोलापूर) असे भाजलेल्या चौघांची नावे आहेत.

मिळालेली माहिती अशी की, हत्तूर येथील मड्डीवस्तीत राहणाऱ्या बोळूरे कुटुंबात सोमवारी सकाळी स्वयंपाक करत असताना गॅसचा स्फोट झाला. यातील भाजलेल्या सोनाली या सकाळी सहाच्या सुमारास दररोजच्या प्रमाणे स्वयंपाक करण्यासाठी किचनमध्ये गेल्या. गॅसचे बॅटन चालू करुन पेटवताना अचानक मोठा स्फोट झाला. काय होतेय हे समजण्यापूर्वीच आगीचे लोळ उठले यात स्वतः सोनाली यांच्यासह तीन वर्षाची आरुषी आणि एक वर्षाचा मलकारीसिद्ध दोन मुलं आणि ७० वर्षाचे वृद्ध शावरसिद्ध भाजले गेले.

यातील चौघांपैकी सोनाली यांच्या चेहऱ्यास, हातास, पाठीला भाजले. तर आरुषी हिच्याही चेहऱ्यासह दोन्ही पाय भाजले आहेत. एक वर्षाच्या शावरसिद्ध याचे हात,पाय, चेहरा गंभीररित्या भाजला आहे. वृद्ध असलेले शावरसिद्ध यांना चेहऱ्याला व दोन्ही हाताला भाजले आहे.

चौघांनाही तातडीने जवळच असलेल्या खासगी दवाखान्यात प्राथमिक उपचार करण्यात आले. तेथून सिलसिद्ध बबुरे यांनी येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. सर्वांवर उपचर सुरु असून, ते शुद्धीवर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

## नोंदणीकृत कागदपत्रांशिवाय स्थावर मालमत्तेची मालकी होऊ शकत नाही – सुप्रीम कोर्ट

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** मालमत्तेच्या टायटल हस्तांतरणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने मोठा निर्णय दिला आहे. एका प्रकरणावर सुनावणी करताना न्यायालयाने म्हटले आहे की, मालमत्तेचे टायटल हस्तांतरित करण्यासाठी नोंदणीकृत दस्तऐवज असणे आवश्यक आहे.

न्यायालयाच्या म्हणण्यानुसार, शीर्षक हस्तांतरणासाठी केवळ विक्री करार किंवा पॉवर ऑफ अ‍ॅटर्नी पुरेसे मानले जाऊ शकत नाही. नोंदणी कायदा 1908 अंतर्गत नोंदणीकृत कागदपत्रे असतील तरच मालमत्तेची मालकी होऊ शकते, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. ज्या प्रकरणात न्यायालयाने आपला निकाल दिला आहे, त्यामध्ये याचिकाकर्त्यार्चे म्हणणे आहे की, तो मालमत्तेचा मालक आहे आणि ही मालमत्ता त्याला त्याच्या भावाने गिफ्ट डीड म्हणून दिली होती. तो म्हणतो की, ही मालमत्ता आपली आहे आणि ताबाही त्याचाच आहे. तर दुर्सया पक्षाने मालमत्तेवर दावा केला आहे आणि म्हटले आहे की त्यांच्याकडे पॉवर ऑफ अ‍ॅटर्नी, प्रतिज्ञापत्र आणि विक्रीचा करार आहे.

दुसऱ्या पक्षाच्या उत्तरात याचिकाकर्त्यार्ने सांगितले की, प्रतिवादीने ज्या कागदपत्रांच्या आधारे दावा केला आहे ती कागदपत्रे वैध नाहीत. नोंदणीकृत कागदपत्रांशिवाय स्थावर मालमत्तेची मालकी होऊ शकत नाही, असे त्यांनी म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाने याला सहमती दर्शवली आणि सांगितले की, स्थावर मालमत्तेची मालकी नोंदणीकृत दस्तऐवजाशिवाय हस्तांतरित केली जाऊ शकत नाही, त्यामुळे प्रतिवादीचा दावा फेटाळला जातो. Power of Attorney न्यायालयानेही याचिकाकर्त्यार्चे अपील मान्य केले. पॉवर ऑफ अ‍ॅटर्नी हा कायदेशीर अधिकार आहे जो मालमत्तेच्या मालकाने दुर्सया व्यक्तीला दिलेला असतो. पॉवर ऑफ अ‍ॅटर्नी मिळवून, ती व्यक्ती त्या मालमत्तेच्या खरेदी किंवा विक्रीशी संबंधित निर्णय घेऊ शकते. पण ही मालमत्तेची मालकी मुळीच नाही. अ‍ॅग्रीमेंट टू सेल हा एक दस्तऐवज आहे ज्यामध्ये मालमत्तेशी संबंधित सर्व तपशील खरेदीदार आणि विक्रेता यांच्यात ठरवले जातात. यामध्ये मालमत्तेची किंमत आणि पूर्ण भरणा याबाबतची सर्व माहिती नोंदवली जाते.




## सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू ठेवून मोहोळ नागरी पतसंस्थे ची गरुड झेप...!

### विश्वासार्हतेमुळेच मोहोळ नागरी चा वेल जातोय 'गगनावरी'– राजन पाटील





**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** लोकनेते बाबुराव अण्णा पाटील आणि त्यांच्या सहकार्यानी १९८४ साली मोहोळ तालुक्यामध्ये सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू ठेवून तालुक्यामधील गरजू आणि होतकरू तरुणांना उद्योगासाठी हातभार लागावा. हाच उदात्त हेतू ठेवून व डोळस दृष्टिकोनातून केवळ ८५०० रुपये भाग भांडवल उभा करून मोहोळ नागरी सहकारी पतसंस्थेची मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतरच्या काळात कर्णधार म्हणून कौशिक गायकवाड यांनी अतिशय काटकसर करून, विश्वास व अभ्यासू दृष्टिकोन ठेवून मोहोळ नागरी पतसंस्थेला उंची प्राप्त करून देण्यासाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिल्याचं मत पतसंस्थेचे मार्गदर्शक तथा माजी आमदार राजन पाटील यांनी व्यक्त केले.

माजी आमदार राजन पाटील हे मोहोळ तालुक्यातील पापरी या गावात मोहोळ नागरी सहकारी पतपुरवठा संस्थेच्या ९ व्या शाखेचे उद्घाटनप्रसंगी व पेनूर येथील शाखेच्या स्थलांतरप्रसंगी अध्यक्षस्थानावरून बोलत होते. तर विद्यमान आमदार यशवंत माने यांच्या हस्ते शानदार वातावरणात उध्दघाटन करण्यात आले.

पुढे बोलताना माजी आमदार राजन पाटील म्हणाले की, आण्णांच्या शिकवणीने, संचालक व कर्मचाऱ्यांच्या मेहनतीमुळेच आज पतसंस्थेच्या माध्यमातून 69 लाख भाग भांडवल व संस्थेकडे सर्व निधी तरतुदीनुसार एकूण 48 कोटी जमा आहेत. ठेवीदारांच्या मध्ये सुद्धा पतसंस्थेने प्रचंड मोठा विश्वास निर्माण केल्यामुळे जवळपास 140 कोटी च्या ठेवी आज ठेविदारांनी पतसंस्थेमध्ये ठेवल्यामुळे पतसंस्थेची भरारी गरुड पक्षाप्रमाणे वाढतच आहे.

सध्याच्या या स्पर्धेच्या युगामध्ये सुद्धा मोहोळ नागरी पतसंस्थेने जिल्ह्यातच नव्हे तर राज्यामध्ये आपल्या कार्यातून आदर्श उभा केला असून गरजू घटकांना आर्थिक मदतीचा हात देऊन ठेविदारांनाही चांगला व्याज दिल्यामुळे ठेवीदार आणि कर्जदार या दोघांनाही पतसंस्थेच्या माध्यमातून समान न्याय मिळाल्यामुळेच आणि पतसंस्थेने कधीही चक्रवाढ व्याज आकारले नसल्यामुळेच या पतसंस्थेचे कार्य अन्य पत्तसंस्थेपेक्षा निश्चितच कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन माजी आमदार राजन पाटील यांनी व्यक्त करून यावेळी उपस्थितांना पतसंस्थेचा झालेला प्रगतीचा आलेख नागरिकांसमोर आपल्या ओघवत्या शैलीत मांडला.

यापसंगी आमदार यशवंत माने म्हणाले की, नाममात्र भाग भांडवलावर सुरू झालेल्या मोहोळ नागरी सहकारी पतपुरवठा संस्थेचे कार्य दिशादर्शक आणि प्रेरणादायी असून सर्वपक्षीय उद्योजकांना या (पान 2 वर..)

## शेतकरी-कामगार-देश विरोधी मोदी नीती हटाओ ! - कॉ. नरसय्या आडम (मास्तर)



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कामगारांनी सव्वाशे वर्षात संघर्ष करून मिळवलेले कामगारांचे सर्व हक्क आणि कायदे नरेंद्र मोदी सत्तेवर आल्यानंतर चार श्रमसंहितांच्या नावाखाली रद्द केले. भारतीय कामगार वर्गाच्या इतिहासातील हा सर्वात गंभीर हल्ला आहे. येत्या निवडणुकीत हे कामगारविरोधी सरकार पुन्हा निवडून आले तर भविष्यातील दिवस सर्वच कामगार-कर्मचा-यांसाठी अत्यंत बिकट होतील. मोदी नीतीच्या ह्या काळात बेरोजगारी आणि महागाई दिवसेंदिवस वाढत आहे, तर दुसऱ्या बाजूला अंबानी, अदानी यांसारख्या मोदींच्या कॉर्पोरेट मित्रांच्या संपत्तीत दरवर्षी लाखो कोटी रुपयांची वाढ होत आहे. आज आपल्या तरुणांना स्थिर आणि चांगले रोजगार उपलब्ध नाही. बेरोजगारी दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच सरकार विरोधी व्यक्त झाल्यास त्यांची रवानगी थेट तुरुंगात हि कुटनीती मोदी सरकारची आहे. हे सरकार पुन्हा सत्तेवर आल्यास आपल्या सारख्या सर्वसामान्यांचा आवाज कायमचा दबला जाईल आणि देशामध्ये हुकुमशाहीची पाळेमुळे रुजतील म्हणून शेतकरी-कामगार-सर्वसामान्य जनता व देश विरोधी मोदी नीती हटाव, भारत देश बचावचा यल्गार ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांनी केंद्र सरकारच्या विरोधात करण्यात आलेल्या आक्रमक धरणे आंदोलनात पुकारला.

सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियनच्या वतीने २७ नोव्हेंबर रोजी केंद्र सरकारच्या विरोधात देशव्यापी महापाडाव ची हाक देण्यात आली. त्या अनुषंगाने सोलापूर येथे सिटूचे राज्य महासचिव कॉ. एम.एच. शेख यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषद पूनम गेट येथे आक्रमक धरणे आंदोलन पार पडले.

यावेळी प्रास्ताविकात कॉ. एम.एच.शेख म्हणाले कि, शिंदे-फडणवीस-पवार सरकारच्या आऊटसोर्सिंग धोरणामुळे किंवा केंद्र सरकारच्या अग्निपथसारख्या योजनांच्या माध्यमातून उपलब्ध होणारा नवीन रोजगार हा तात्पुरता, कंत्राटी किंवा नैमित्तिक म्हणजेच वापरा आणि फेकून या अशा प्रकारचा असणार आहे. खाजगी क्षेत्रातही हीच परिस्थिती आहे. बहुसंख्य तरुणांच्या भविष्यात अंधःकारच असणार आहे हे स्पष्ट दिसते आहे.

मोदी सरकार बीएसएनएल टॉवर नेटवर्क, रेल्वे मार्ग, रेल्वे स्थानके आणि रेल्वे, संपूर्ण कोकण रेल्वे, कोळसा खाणी, गॅस आणि तेल पाईपलाईन, सरकारी अन्नधान्याची गोदामे, २५ विमानतळे, मऊ मोठी बंदरे, हजारो किलोमीटरचे रस्ते, वीज पारेषण वाहिन्या, सरकारी जमीनी आणि इमारतींची प्रचंड संपत्ती, देशाची सार्वजनिक मालमत्ता अदानी आणि अंबानी यांसारख्या कॉर्पोरेट मित्रांच्या गुजरातमध्ये मुख्यालय असणाऱ्या मोठ्या कॉर्पोरेशन्सला आंदण देत आहे. हेच मोदी नीतीच विकासाचे गुजरात मॉडेल आहे. शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात वेदांता-फॉक्सकॉनचा सेमीकंडक्टर प्लांट, बोईंगचा एअरक्राफ्ट प्लांट आदी महत्वाचे प्रकल्प महाराष्ट्रातून गुजारातला हलविण्यात आले.

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना आणि विमा क्षेत्राला मोदींच्या कॉर्परिट मित्रांना निधी पुरवण्यास भाग पाडले जात आहे. मोदी आपल्या कॉर्पोरेट मित्रांची समृध्दी वाढवण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि अगदी रिझर्व्ह बँकेलाही दिवाळखोरीच्या खाईत ढकलत आहेत. मोदींच्या नोटबंदी आणि जीएसटीच्या धोरणांमुळे छोटे व्यापारी, छोटे व्यावसायिक आणि उत्पादक यांचे कंबरडे मोडले आहे. ते अडचणीत सापडले आहेत. याचा फायदा ॲमेझॉन, जिओ, गुगल आणि वॉलमार्टसारख्या बड्या ऑनलाईन कंपन्यांना होत आहे आणि होणार आहे.

मोदी नीतीने पुढे आणलेल्या राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ने सर्वांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या हक्कावरच घाला घातला आहे. सरकारी शाळा-महाविद्यालयांची जागा सर्वसामन्यांना न परवडणाऱ्या खासगी शाळा-महाविद्यालये घेत आहेत. सरकारी शाळा बंद केल्या जात आहेत. विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत. डिजिटल कॉर्पोरेशन्स आणि ऑनलाईन शिक्षण ह्यावर नियंत्रण आणि वर्चस्व असेलेली कॉर्पोरेट-आरएसएसची युती शिक्षण व्यवस्थेवरच ताबा मिळवण्याचा प्रयत्न करीत आहे. न्यूजक्लिकसारखे न्यूज पोर्टल कामगारांचे आणि शेतकऱ्यांचे प्रश्न आणि सत्य माहिती सर्वसामान्य जनतेपुढे मांडून सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारतात, कोळसा आयातीसारख्या घोटाळ्यात गुंतलेल्या लुटारू कॉर्पोरेटस्चा पदार्फाश करतात, तेंव्हा अशा महाघोटाळ्यांची चौकशी करण्याऐवजी लुटास कार्पोरेटस्नां संरक्षण देण्यासाठी मोदी सरकार ईडी, सीबीआय, एनआयए आणि आयटीसारख्या यंत्रणांचा आणि यूएपीएसारख्या कठोर कायद्यांचा गैरवापर करून प्रश्न विचारणाऱ्यांचा आवाज बंद करण्याचा, लोकशाहीचा गळा घोटण्याचा प्रयत्न करत आहे.

यावेळी व्यासपीठावर नलिनी कलबुर्गी, मुरलीधर सुंचू, सिद्धप्पा कलशेट्टी, शेवंता देशमुख, डी.रमेश बाबू, व्यंकटेश कोंगारी, शकुंतला पानिभाते, रंगप्पा मरेड्डी, ॲड. अनिल वासम आदींची उपस्थिती होती. यावेळी नसीमा शेख, युसुफ मेजर आदींनी सभेला संबोधित केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ॲड.अनिल वासम यांनी केले. यावेळी हजारोंच्या संख्येने महिला व पुरुष उपस्थित होते.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सलीम मुल्ला, विल्यम ससाणे, दाऊद शेख, नरेश दुगाने, जावेद सगरी, बापू साबळे, विक्रम कलबुर्गी, अप्पाशा चांगले, हुसेन शेख राजेश काशीद, असलं शेख, प्रशांत चौगुले, हरीश पवार, फिरोज शेख, अमीन शेख, युसुफ कालू सिद्राम गायकवाड, नितीन गुंजे, संदीप धोत्रे, बजरंग गायकवाड, नितीन कोळेकर, गंगाराम निंबाळकर, राजू गेंटयाल, बालाजी तुम्मा, अंबादास बिंगी, विजय मरेड्डी, वीरेंद्र पद्मा, बालाजी गुंडे, बाळकृष्ण मल्याल, प्रवीण आडम, विजय हरसुरे, रफिक काझी, वासिम देशमुख, नरेश गुल्लापल्ली, दिनेश बडगु, प्रभाकर गेंटयाल, रवींद्र गेंटयाल, अकिल शेख, असिफ पठाण, इलियास सिद्धिकी, दीपक निकंबे, सनी शेट्टी, शाम आडम , दत्ता चव्हाण, अभिजित निकंबे, सनी आमटी, मल्लिकार्जुन बेलीयार, प्रकाश कुऱ्हाडकर, युसुफ शेख, संजय ओमकार , शिवा श्रीराम,आदींनी परिश्रम घेतले.

# फसवणुकीच्या गुन्ह्यात शिक्षा भोगत असलेल्या आरोपीस जामीन मंजूर; शिक्षेलाही स्थगिती

## आरोपीतर्फे ॲड. सुरज गायकवाड यांनी पाहिले काम

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर येथील आरोपी सचिन अण्णाप्पा गायकवाड यास फसवणुकीच्या गुन्ह्यांमध्ये शिक्षा भोगत असताना सोलापूर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने अपिलांमध्ये जामीन मंजूर करत शिक्षेलाही स्थगिती दिली आहे. याबाबत सविस्तर मिळालेली अधिक माहिती अशी की, मूळ आरोपी सचिन गायकवाड यास भादंवि कलम ४२० च्या एकूण ४ गुन्ह्यांमध्ये सोलापूर येथील मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयाने शिक्षा सुनावली होती. त्यामुळे आरोपी हा येरवडा येथील



मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत होता. शिक्षा भोगत असतानाच आरोपीने चारही गुन्ह्यांमधील शिक्षेविरोधात सोलापूर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयात ॲड. सुरज गायकवाड यांचेमार्फत एकूण ४ अपीले दाखल करून अपिलांसोबतच ४ जामीन अर्ज देखील दाखल केले होते. जामीन अर्जांना सरकार पक्षातर्फे विरोध करण्यात आला. तथापि जामीन अर्जावर आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद व जामीन अर्जासोबत दाखल केलेल्या माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्याचा संदर्भ ग्राह्य धरत सोलापूर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने आरोपी/अपिलार्थी यास चारही अपिलांमध्ये काही अटी व शर्तीसह जामीन मंजूर केले, सोबतच चारही गुन्ह्यांच्या शिक्षेला स्थगितीही दिली आहे. आरोपी/अपिलार्थी तर्फे ॲड. सुरज गायकवाड यांनी तर सरकारतर्फे ॲड. देशपांडे यांनी काम पाहिले.

# पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील वीजप्रश्न सोडवण्यासाठी महावितरण प्रशासनाने प्राधान्य द्यावे - सोमनाथ आवताडे

**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):–** पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांचे वीज प्रश्न तसेच या मतदारसंघातील आवश्यक आणि प्रस्तावित मागण्या पूर्ततेसाठी महावितरण विभागाने प्राधान्य द्यावे अशी मागणी पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे युवक नेते सोमनाथ अवताडे यांनी केली आहे.



सोलापूर जिल्हा नियोजन भवन येथे महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळाच्या बैठकीस पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान दादा आवताडे यांच्यावतीने कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती तथा युवक नेते सोमनाथ आवताडे, श्री. अविनाश मोरे व स्वीय सहाय्यक रावसाहेब फटे यांनी उपस्थिती दर्शविली होती त्याप्रसंगी ते आपली भूमिका मांडत होते. शेतकऱ्यांना शेतीसाठी वीज त्यांच्या सोयीच्या वेळेत मिळावी यासाठी माजी सभापती आवताडे यांनी आग्रही भूमिका यावेळी मांडली. रात्री होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे शेतीच्या ठिकाणी अपघात घडण्याच्या बातम्या कानावर येत आहेत याकडेही त्यांनी महावितरण प्रशासनाचे लक्ष वेधले.

सदर प्रसंगी महावितरण संचालक विश्वास पाठक यांच्याशी पंढरपूर -मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील आवश्यक व प्रस्तावित मागण्या तसेच वीज प्रश्नांवर महत्त्वपूर्ण चर्चा झाली.

यावेळी माजी मंत्री तथा आमदार सुभाष देशमुख आमदार शहाजीबापू पाटील तसेच महावितरण विभागाचे संबंधित अधिकारी पदाधिकारी आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

# निष्काळजीपणे वाहन चालवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी वाहन चालकाची निर्दोष मुक्तता

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर नई जिंदगी येथील रहिवासी फिरोज उमरसाब नदाफ यांची निष्काळजीपणे वाहन चालवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी सोलापूर येथील ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट वर्ग एक म.ज.मोहोड यांनी युक्तिवाद ग्राह्य धरून निर्दोष मुक्तता केली आहे.

थोडक्यात हकीकत अशी की, " दिनांक 26 सप्टेंबर 2015 रोजी संध्याकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास दक्षिण सोलापूर तालुक्यातील नांदणी येथील नागम्मा मंदिराच्या समोर आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन सार्वजनिक सुरक्षितता धोक्यात येईल किंवा एखाद्या व्यक्तीस दुखापत होईल असे बेदरकारपणे, घाई घाईने व निष्काळजीपणे चालवून हुसेनी शेख यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्या प्रकरणी आरोपी विरुद्ध मंद्रूप पोलीस स्टेशन येथे भा.द.वि .कलम 279, 304/अ, 337 व 338 तसेच मोटार कायदा कलम 183 व 184 अंतर्गत गुन्हा दाखल केला होता.याप्रकरणी पोलीस तपास करून आरोपी विरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. या प्रकरणाची सुनावणी जुडीशियल मॅजिस्ट्रेट वर्ग- 1 म.ज.मोहोड यांचे कोर्टासमोर झाली. एकूण चार साक्षीदाराच्या साक्षी नोंदवण्यात आल्या. याप्रकरणी आरोपीचे वकील अँड. गुरुदत्त बोरगांवकर यांनी साक्षीदारांच्या जबाबतील विसंगती कोर्टाच्या निदर्शनास आणून देऊन त्या अनुषंगाने युक्तिवाद केला.

हा युक्तिवाद ग्राह्य धरून मे. कोर्टाने आरोपीची निर्दोष मुक्तता केली आहे. या प्रकरणात आरोपीतर्फे अँड. गुरुदत्त बोरगांवकर, अँड. देवदत्त बोरगांवकर, अँड .विश्वास शिंदे , अँड. रजनी कोरके अँड. तेजस्विनी रुपनर व सरकारतर्फे अँड.आनंद काळे यांनी काम पाहिले.

# पंढरपूरात 26/11 शहिद दिनानिमित्त युवासेनेच्या वतीने भव्य रक्तदान शिबीर संपन्न..!

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):–** 26/11 शहिद दिना निमित्त व शहिद मेजर कुणालगीर गोसावी यांच्या स्मरणार्थ पंढरपूरात शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे युवा सेना शहरप्रमुख श्रीनिवास उपळकर यांच्या संकल्पनेतून भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले.



यावेळी पोलीस – नाईक श्री प्रशांत कुंदूरकर साहेब यांनी शहिद वीर जवानांच्या प्रतिमेचे पूजन करून "भव्य रक्तदान शिबीराचे उदघाटन" केले.

चला रक्तदान करूयात... शहिदांना आदरांजली वाहूयात... या ब्रिद वाक्यावर या रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात युवकांनी या भव्य रक्तदान शिबिरात रक्तदान करून शहिद वीर जवानांना आदरांजली वाहिली. यावेळी माजी नगरसेवक रामभाऊ भिंगारे, माजी नगरसेवक किरणराज घाडगे, समाजसेवक अरूणभाऊ कोळी, शिवसेना शहरप्रमुख रविंद्र मुळे, समाजसेवक संजय बाबा ननवरे, उप-शहरप्रमुख तानाजी मोरे, लंकेश बुराडे, विभाग प्रमुख उमेश काळे, पिंटू गायकवाड यांनी या भव्य रक्तदान शिबिराला भेट दिली.

याप्रसंगी युवासेना शहरप्रमुख श्रीनिवास उपळकर, समाजसेवक गणेश भिंगारे, युवक काँग्रेसचे शहर अध्यक्ष संदीप शिंदे, रोहित लाला पानकर, समाजसेवक कृष्णा कवडे, दत्तात्रय वाडेकर, भाऊ टमटम, शिवभक्त ग्रुपचे अध्यक्ष समाधान पोळ, तानाजीराजे गुंजाळ, राजेश नेमाडे, माऊली शिंदे, महेश कोरके, शिवक्रांती संघटनेचे शहराध्यक्ष माऊली चव्हाण, आनंद शिंदे, गणेश बारसकर, अमर उपळकर, भालेश टमटम, शुभम उपळकर, महेश डोळसे, बबलू वैरागकर, सोमनाथ रणदिवे, आकाश शिंदे, दत्ता सुतार, महेश पिसाळ, स्वागत कवडे आदी उपस्थित होते.

# मागासवर्गीय अनुदानित वसतीगृह कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीसाठी आ.बच्चु कडू यांच्या प्रयत्नाला यश

## मुख्यमंत्री यांनी घेतला वेतन श्रेणीचा निर्णय



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली व आमदार बच्चु कडू यांच्या प्रयत्न ा मुळे अनुदानित वसतीगृह कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करण्यासंबंधी जी शासकीय बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीमध्ये वसतीगृहाच्या चारही पदांना (अधीक्षक, स्वयंपाकी, चौकीदार, मदतनीस) वेतनश्रेणी लागू करणे संबंधी परिपूर्ण प्रस्ताव तयार करून लवकरात लवकर मंत्रिमंडळ बैठकीसमोर (कॅबिनेट) ठेवण्यात यावा आणि राज्यातील अनुसूचित जातीच्या मुलामुली करिता चालवल्या जाणाऱ्या आश्रमशाळा, त्यांची सलग्न वसतीगृह, कर्मचारी व विजाभजच्या आश्रम शाळा व त्यांची सलग्न वसतीगृह कर्मचारी आणि मागासवर्गीय अनुदानित वसतीगृह कर्मचारी यांच्या समान काम समान वेतन या न्याय तत्त्वानुसार वेतनातील फरक दूर करून समानता आणावी यावर चर्चा करून निर्णय घेण्यात आला. या बैठकीला राज्यातल्या सर्व विभागातील सचिव, वित्त विभागाचे सचिव व राज्याचे मुख्य सचिव उपस्थित होते. वसतीगृह कर्मचाऱ्यांना न्याय देण्याची भूमिका या बैठकीमध्ये घेतल्यामुळे बच्चू कडू व सामाजिक न्याय विभागाचे सचिव सन्माननीय सुमंत भांगे, उपसचिव डिंगळे यांचा महाराष्ट्र राज्य अनुदानित वसतीगृह कर्मचारी संघटनेच्या वतीने मंत्रालयमध्ये भेट घेऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी संघटनेचे प्रदेश अध्यक्ष मारुती कांबळे, येळीकर, शालिनीताई मयूर, जावरकर, प्रदीप वाकपैंजण, विशाल कदम, कुंनघाडकर, चुन्नीलाल पवार, झुंजारराव, देसले सिधेवाड नांदेड, विशाल कदम, प्रदीप कुमार मयूर, तुळशीराम भोवर, प्रीती गोस्वामी व वस्तीग्रह पदाधिकारी उपस्थित होते.

# पाणी सोडल्याशिवाय अन्न व पाण्याचा कणही घेणार नाही

## एकरूख उपसा सिंचन संघर्ष समितीच्या वतीने बुधवारपासून आमरण उपोषण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** एकरूख उपसा सिंचन योजना तात्काळ कार्यान्वित करून आवर्तन सुरू करावे. आश्वासन दिले कार्यवाही केली नाही. तेव्हा आता येत्या बुधवारपासून आमरण उपोषण करण्यात येणार आहे. पाणी सोडल्याशिवाय अन्न व पाण्याचा एक कणही घेण्यात येणार नाही, असा इशारा एकरूख उपसा सिंचन पाणी संघर्ष समितीच्या वतीने कृष्णात पवार यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.

सोमवार दि. 27 नोव्हेंबर 2023 रोजी पासून होटगी वितरिका कॅनॉल, कर्देहळ्ळी फाटा, कुंभारी येथे आमरण उपोषण करण्यात येणार होते मात्र त्याऐवजी आता येत्या बुधवारी 29 नोव्हेंबर पासून हे उपोषण करण्यात येणार आहे. एकरूख उपसा सिंचन योजनेला सन 1996 मध्ये मंजुरी देण्यात आली मात्र दरम्यानच्या काळात योजना रखडली होती. या योजनेचे काम 85 टक्के पूर्ण झाले आहे.

चाचणी ही झाली आहे पण राजकीय इच्छाशक्ती अभावी पाणी सोडले जात नाहीत असा आरोप यावेळी कृष्णात पवार यांनी केला. ही योजना कार्यान्वित करण्यासाठी समस्त दक्षिण सोलापुरातील ग्रामस्थांच्या वतीने यापूर्वीही जिल्हाधिकारी व मंत्री स्तरावर निवेदन देऊन विनंती केली. त्यानंतर या योजनेची मार्च 2021 मध्ये चाचणीही घेण्यात आली होती. एकरूख योजनेसाठी 1.18 टीएमसी हक्काचे पाणी राखीव आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील 19 गावे व अक्कलकोट तालुक्यातील 51 गावे या योजनेअंतर्गत आहेत. यामुळे या योजनेतून पाण्याची प्रतीक्षा चातकाप्रमाणे ही गावे करत आहेत. टेल टू एंड व समन्यायी पाणी वाटप होत नसल्याने वेळोवेळी संबंधित पाटबंधारे खात्यास योजना कार्यान्वित करून आवर्तन सुरू करण्याची मागणी करण्यात आली. दरम्यान, दि. एक नोव्हेंबर 2023 रोजी पालकमंत्री यांना निवेदन दिल्यानंतर या योजनेतून आवर्तन चालू करण्याचे आश्वासन संबंधित विभागाने दिले मात्र आध्यात्मिक कार्यवाही नाही. यामुळे नाईलाजास्त आमरण उपोषण करावे लागत आहे. प्रारंभी कृष्णात पवार हे आमरण उपोषण करणार असून त्यानंतर इतर ग्रामस्थ सहभागी होणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी या आंदोलनाला पाठिंबा द्यावा, असे आवाहनही यावेळी महेश बिराजदार यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस हरिदास पौळ, रविकांत डोळे आदी उपस्थित होते.

### विकणे आहे
### जाहीर प्रसिध्दीकरण

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

अ) जिल्हा सोलापूर, ता. मोहोळ पैकी मौजे बोपले येथील शेत जमीन गट नं.२२८/२ याचे क्षेत्र ० हे २१ आर यांसी आकार १ रु. १५ पैसे इतके असून सदर मिळकत ही शेतजमिन आहे. यांसी चतु:सिमा- पुर्वेस- गट नं. २२७ पैकी बिरा ढेरे जमिन, दक्षिणेस- गट नं. २२८/३ आनंद ढेरे यांची जमीन, पश्चिमेस - बिभिषण ढेरे यांची जमीन, उत्तरेस- गट नं. २२८/१ धनाजी ढेरे यांची जमिन, येणेप्रमाणे चतु: सिमेतील मिळकत व त्यातील दगड, माती वगैरे तदंगभूत वस्तुसह व इजमेंन्ट राईटसह.

ब) जिल्हा सोलापूर, ता. मोहोळ पैकी मौजे बोपले येथील शेत जमीन गट नं.२२६/३ याचे क्षेत्र हे २२ आर यांसी आकार १ रु. ०५ पैसे इतके असून सदर मिळकत ही शेतजमिन आहे. यांसी चतु:सिमा- पुर्वेस- सिना नदी, दक्षिणेस- गट नं. २२६/४ हणमंत ढेरे यांची जमीन, पश्चिमेस- गट नं.२२७ पांडूरंग ढेरे यांची जमीन, उत्तरेस- गट नं. २२६/२ आनंद ढेरे यांची जमिन, येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत व त्यातील दगड, माती वगैरे तदंगभूत वस्तुसह व इजमेंन्ट राईटसह.

वर नमूद केलेल्या शेतजमीनी ह्या आमचे अशिल श्री. तात्या पोपट गायकवाड, रा. कुरणवाडी, ता.मोहोळ, जि.सोलापूर यांच्या प्रत्यक्ष मालकी, कब्जे वहिवाटीच्या असून सदरच्या दोन्ही जमीनी या निर्वेध व निर्जोखमी आहेत असा निर्वाळाही दिलेला आहे. तरी कोणास विकत घ्यावयाच्या आहेत त्यांनी खालील अशिलाचे मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा. हे जाहीर प्रसिध्दीकरण दि. २७/११/२०२३

अशिल
श्री. तात्या पोपट गायकवाड
मोबाईल क्रमांक ७४१०५१५२०३

अशिलातर्फे ॲडव्होकेट
ॲड. ज्ञानेश्वर भिवा एडगे,
बी. ए. एलएल बी.
मु.पो. विटले, ता. मोहोळ, जि. सोलापूर
मो.नं.८३२९३७८२०७


## Classified - छोटी जाहीरात

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**
दारू... अंमली पदार्थ... गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्अॅप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...
501% रिझल्ट

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, नागाळा पार्क (कोल्हापूर).**
–: संपर्क :–
8083608083
9922646566
8698732109

**R.K कन्स्ट्रक्शन्स्**
इं. स्वप्निल पोपट कदम M.E. (Structure) B.E. (Civil)
Mo. 9552547272, 8788832033


वाचकांसाठी निवेदनः या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# मध्य रेल्वे सोलापूर विभागात संविधान दिन-2023 साजरा करण्यात आला



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** संविधान दिन–2023 निमित्त 26 नोव्हेंबर रोजी सकाळी 11.00 वाजता विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयाच्या प्रांगणात माननीय विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री नीरज कुमार दोहरा यांच्या हस्ते भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. मंडळ रेल्वे कार्यालयातील सर्व उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रास्ताविकेचे वाचनाची पुन्रवृत्ती केली. या कार्यक्रमात अप्पर विभागीय रेल्वे व्यवस्थापक शैलेंद्र सिंह परिहार, जी.पी. भगत, वरिष्ठ विभागीय कर्मचारी अधिकारी व इतर शाखा अधिकारी उपस्थित होते.

सोलपूर विभागातील सर्व आगार प्रभारी आणि युनिट प्रभारी यांनी त्यांच्या अधीनस्थ कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी संविधानाची प्रस्तावना वाचन केले.

# मार्डीत संविधान दिन उत्साहात साजरा

**मार्डी (कटूसत्य वृत्त):–** मार्डीत संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी भारताचे संविधान ची प्रास्ताविकेचे वाचन करून,२६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या दिवंगत पोलीस अधिकारी अशोक कामटे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या प्रतिमेचे पूजन अंजू ज्योतीबा पाटील यांच्या हस्ते करून मेणबत्त्या लावून शहीदांना संत वीरशैव कक्कया समाजाच्या व्यायामशाळेत आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी दिवाणी क्षेत्रातील नामवंत विधीज्ञ इंद्रजित पाटील व अंजू पाटील यांची समयोचीत भाषणे झाली. याप्रसंगी गावचे उपसरपंच श्रीकांत मातंर्डे,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नामदेव गवळी सर,पंचायत समितीचे माजी सदस्य



बाळासाहेब पाटील,ॲड.अजित पाटील,पोपट साठे, भिमाशंकर नारायणकर, पृथ्वीराज माने युवा मंच उत्तर सोलापूर चे सचिव भगवान कदम, सतीश उर्फ दादासाहेब पाटील, चंद्रकांत नारायणकर, दगडू गिरे,यांच्यासह बहुसंख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी सामाजिक कार्याबद्दल पुणे येथील वीरशैव कक्कया समाजाच्या वतीने राष्ट्रीय कॉंग्रेस आय पक्ष,उत्तर सोलापूर चे सरचिटणीस व या कार्यक्रमाचे संयोजक संजय खरटमल यांचा यथोचित सत्कार पाटील कुटुंबियांच्या वतीने अंजू पाटील यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन करण्यात आला.

याप्रसंगी प्रास्ताविक विष्णू जगताप यांनी केले तर आभार नामदेव गवळी यांनी मानले.

# कटूसत्य शब्दकोडे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | | ४ | ५ | ■ | ६ | | ७ | ■ |
| | ■ | ८ | | ■ | ९ | | | | ■ | १० | ११ |
| १२ | १३ | ■ | १४ | | ■ | | ■ | १५ | १६ | ■ | |
| ■ | १७ | | | ■ | १८ | | ■ | १९ | | २० | ■ |
| २१ | | ■ | ■ | २२ | | ■ | २३ | ■ | २४ | | ■ |
| २५ | | | ■ | | ■ | २६ | | | | ■ | २७ |
| २८ | | ■ | २९ | | ■ | ३० | | ■ | ■ | ३१ | |
| | ■ | ३२ | | | ■ | | ■ | ३३ | ३४ | | |
| ■ | ■ | | ■ | ३५ | ३६ | ■ | ३७ | | | ■ | ■ |
| ■ | ३८ | | ३९ | | | ■ | ४० | | | ४१ | ■ |
| ४२ | | ■ | ४३ | | ■ | ४४ | | | ■ | ४५ | ४६ |
| ■ | ४७ | | | ■ | ४८ | | ■ | ■ | ४९ | | |

**उभे शब्द :** १) सुवासिक लाकूड देणारे झाड २) हा चिरताना डोळ्यातून पाणी येते ३) फोटो (हिंदीत) ४) निंदा, **टिपण्णी ५) त्वरेने, लगेच ६) अंतराळ, थोडा अवधी असणे ७) युध्दानंतरची समेटाची बोलणी १०) पिकांचा हिवाळ्यातील हंगाम १३) उत्कर्ष, विकसित होणे १६) फॅक्टरी (मराठीत) १८) पाकिस्तान संक्षिप्तमध्ये असे लिहितात २०) दहा (हिंदीत) २१) शालेय गाईड पुस्तकांचे प्रकाशन संस्था २२) भारतीय कसोटी टीममधील एक फलंदाज २३) स्वर्गच्या विरूध्दार्थी २६) झेंडा, मंगलसमयी सुशोभित करण्यासाठी या रांगेने लावतात २७) श्रीगणेशाचे वाहन २९) शर्थ ३१) एक भाजी ३२) इंदिरा गांधी यांच्या आईचे नाव ३३) देवतांचे पेय ३४) पात्र, गुणवान ३६) कागदी दस्त्यांचे माप ३७) साईबाबांचा संदेश-*** मालिक एक ३८) मिरवणुकीप्रसंगी हा उधळतात ३९) एक पांढऱ्या रंगाचा पक्षी ४१) पाणी साठवण केलेला मोठा बंधारा ४४) टभ उलट लिहा ४६) एक हजार कि.ग्रॅ. म्हणजे एक **

**आडवे शब्द :** १) महाराष्ट्र भाजपचे एक नेते ६) राज ठाकरे यांच्या मुलाचे नाव ८) नोकर, गुलाम ९) कावळ्याचे ओरडणे १०) मावळ्यांची घोषणा- ** हर महादेव १२) आकाश १४) पाच गुणिले चार १५) चुलत्यांना या नावाने संबोधतात १७) ताणला जाणारा लवचिक पदार्थ १८) पलीकडे, पल्याड १९) राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष (फक्त नाव) २१) भन (उलट लिहा) २२) तपासणे, धनादेश (इंग्रजीत) २४) विशेष, स्पेशल २५) श्रीविष्णूचा एक अवतार, डुक्कर २६) लायसन (मराठीत) २८) व्यवस्थित, **नेटके २९) घोडा ३०) दह्यात पाणी मिसळून हे बनवितात ३१) लग्न (हिंदीत) ३२) कापण्याचे साधन (इंग्रजीत) ३३) सुशीलकुमार शिंदे यांचा जिल्हा ३५) गोलाकार तळून केलेला खाद्यपदार्थ ३७) वेळ (हिंदीत) ३८) सोनाली कुलकर्णी अभिनीत एक चित्रपट, एक गोड खाद्यपदार्थ ४०) प्रगती, उन्नती ४१ ) उन्हाळ्यातील एक महिना ४२) एक म्हण-बैल गेला झोपा ** ४३) रवा, शिरा ४४) उजाड माळरान ४५) समुद्राच्या पाण्याची लहर ४७) नदीकाठची लवचिक वनस्पती ४८) पोट (हिंदीत) ४९) श्रावण (हिंदीत)

### शब्दकोडे क्र. ३३ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | रू | ण | जे | ट | ली | ■ | का | म | गा | र | ■ |
| र | मा | ■ | ल | ■ | ट | र | बू | ज | ■ | स | ल |
| बा | ल | क | ■ | ट | र | फ | ल | ■ | न | र | क |
| ज | ■ | पा | च | र | ■ | ■ | ■ | मा | व | शी | ■ |
| खा | र | ट | ■ | ट | पा | ल | ■ | ■ | सा | त | ■ |
| न | न | ■ | प | र | व | ड | ■ | स | ग | ■ | जा |
| ■ | र | स | द | ■ | ■ | का | र | भा | र | ■ | ने |
| ■ | ■ | त | क | दि | र | ■ | का | स | ■ | का | वा |
| अ | ठ | रा | ■ | ■ | वि | ■ | ना | द | ■ | प | री |
| ठ्ठा | ■ | ■ | न | व | ना | थ | ■ | ■ | ग | ड | ■ |
| वी | ज | ■ | ज | न | ■ | क | ड | व | ट | ■ | म |
| स | ल | वा | र | ■ | ■ | वा | फ | ■ | र | ज | त |

# अपर्णा रायचूर स्मृतिदिनानिमित्त अवयवदान जागृतीसाठी ३ डिसेंबरला लघुपटाचे आयोजन




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अपर्णा रायचूर यांच्या दुसऱ्या स्मृतिदिनानिमित्त " अवयवदान... गरजूंना वरदान" ही चळवळ तळागाळात पोहोचवण्याच्या हेतूने दिनांक 3 डिसेंबर 2023 रोजी ई-स्क्वेअर येथे अवयवदान संदभार्तील ' राख' आणि 'दुविधा' हे दोन लघुपट दाखविण्यात येणार असल्याची माहिती डॉ.हरीष रायचूर यांनी श्रमिक पत्रकार संघात झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.पत्रकार परिषदेत पुढे बोलताना. डॉ. रायचूर म्हणाले की, " अपर्णा रायचूर यांच्यावर 2017 मध्ये शुगरच्या त्रास झाल्यानंतर लिव्हर ट्रान्सप्लांट शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली होती.त्यानंतर चार वर्ष अपर्णा रायचूर यांनी अवयवदान जागृतीसाठी तन,मन, आणि धन समाजासाठी अर्पण करून अवयव दान चळवळीसाठी फार मोठं योगदान दिलं.दोन वर्षापूर्वी त्यांचे निधन झाले. त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आणि त्यांचे कार्य पुढे नेण्यासाठी रायचूर कुटुंब अवयव दान चळवळीमध्ये सक्रिय असून त्यासाठीच हा वसा पुढे चालवत आहोत.

त्याच धर्तीवर अपर्णा रायचूर यांच्या दुसऱ्या स्मृतिदिनाची औचित्य साधून 3 डिसेंबर 2023 रोजी ई-स्क्वेअर येथे राख आणि दुविधा या दोन्हीही राहुल पणशीकर दिग्दर्शित लघुपटात मोहन जोशी यांची प्रमुख भूमिका आहे.

सुप्रसिद्ध सिने - नाट्य अभिनेते मोहन जोशी आणि राहुल पणशीकर या कार्यक्रमासाठी या दिवशी आवर्जून उपस्थित राहणार आहेत.

अज्ञान आणि अंधश्रद्धेमुळे अवयव दान ही चळवळ काळाच्या ओघांमध्ये पुढे जाण्याऐवजी थांबली आहे. ती सजग करण्यासाठी आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे.

या माध्यमातून प्रबोधन करणे आणि सामान्य नागरिकांना अवयव दान किंवा देहदान याचे महत्व पटवून देण्यासाठीच आम्ही हे प्रबोधनाचे कार्य करत असल्याचे यावेळी उदय आळंदकर यांनी सांगितले.

सुप्रसिद्ध अभिनेत्यांशी संवाद साधण्याची आपल्याला यानिमित्ताने संधी मिळणार आहे. तरी सोलापूरकरांनी या संधीचा लाभ घ्यावा. या लघुपटाची मोफत प्रवेशिका, रायचूर आय केअर सेंटर, विजापूर रोड सोलापूर येथे, 1 आणि 2 डिसेंबरला दुपारी बारा ते पाच या वेळेत मिळणार आहेत.

प्रवेशिकांसाठी मो.: - 8668823206 आणि मो.: - 9423526748 या क्रमांकावर संपर्क साधावा आणि लघुपट पाण्यासाठी सोलापूरकरांनी सहभागी व्हावे असे आवाहन डॉ. हरीष रायचूर यांनी पत्रकार परिषदेत शेवटी बोलताना केली.या पत्रकार परिषदेला राम जोडमोटे, उदय आळंदकर, प्रिया पवार, अरुण जोशी, रोहित जोशी, मीनाक्षी जोशी उपस्थित होते.

# नेताजी प्रशालेत संविधान दिन व शाहिद दिन उत्साहात



**सोलापूर(कटूसत्य वृत्त):-** नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेत भारतीय संविधान दिन व शाहिद दिन उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य रविशंकर कुंभार होते . प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्राचार्य विजयकुमार हुल्ले उपस्थित होते.प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर व शाहिद अशोक कामटे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, राजकुमार मरगुरे, उमदेवी कुंभार व ज्ञानेश्वर म्हेत्रे उपस्थित होते. प्रतिमा पूजनानंतर संविधानाची शपथ घेण्यात आली. भावना येमूल, अक्षता कंनकट्टी, स्वप्निल स्वामी, सृष्टी माळी, स्नेहा स्वामी व भाग्यश्री नागेल्ली विद्यार्थ्यांनी भाषण केले. माजी प्राचार्य विजयकुमार हुल्ले, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, राजकुमार मरगुरे, ज्ञानेश्वर म्हेत्रे व उमादेवी कुंभार यांनी मनोगतातून संविधानचे महत्त्व सांगितले. अध्यक्षिय भाषणात प्राचार्य रविशंकर कुंभार म्हणाले, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताची राज्यघटना लिहिल्यामुळेच जगभरात भारतीय संविधान श्रेष्ठ आहे. कायद्यांवरच देशाची वाटचाल चालू आहे. तसेच २६/११ च्या घटनेत भारतीय शूर वीर अधिका-यांनी सर्वसामान्यांच्या रक्षणासाठी शहिद झाले. त्यांचे सर्व भारतीयांना अभिमान असल्याचे सांगून शहिदांना श्रद्धांजली अर्पण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवानंद पुजारी यांनी केले तर इरणा कलशेट्टी यांनी आभार मानले.

# २६/११ शहीदांच्या स्मरणार्थ ११६ जणांचे रक्तदान

## आर जे सामाजिक संस्थेचा उपक्रम



**मोहोळ(कटूसत्य वृत्त):-** २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात देशासाठी प्राणाची आहुती दिलेल्या शहिदांच्या स्मरणार्थ कोन्हेरी ता. मोहोळ येथे आर जे युवा मंच सामाजिक बहुउद्देशीय संस्था च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरामध्ये ११६ रक्तदात्यांनी आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कोन्हेरी (ता. मोहोळ) येथे आर जे युवा मंच सामाजिक बहुउद्देशीय संस्था तसेच आर जे फाउंडेशन च्या वतीने २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात देशासाठी प्राणाची आहुती दिलेल्या शहिदांच्या स्मरणार्थ प्रत्येक वर्षी विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. याच पार्श्वभूमीवर यावर्षी आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिरामध्ये ११६ रक्तदात्यांनी आपला उत्स्फूर्त सहभाग दर्शवला. प्रारंभी शहिदांच्या प्रतिमेचे पूजन संस्थापक रामदास जरग, ग्रामपंचायत सदस्य प्रा. राजकुमार पाटील, माजी उपसरपंच बाबुराव शेळके, हरिदास माळी मेजर, ग्रामपंचायत सदस्य धर्मराज कांबळे, शिवाजी गाडे, मारुती माने, भारत माळी, भास्कर शेळके, संतराम जरग, गोरख लवटे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी अज्ञान शेळके, दत्तात्रय मुळे, हरिदास माने, प्रा. रमेश चव्हाण, परमेश्वर माने, अध्यक्ष संदीप जरग, उपाध्यक्ष राहुल तांबिले, सचिव महादेव माने, नितिन सुभाष जरग, अशोक शेळके, गणेश शेळके, दीपक जरग, अविनाश सुतार, दादा गोरे, अक्षय ब्लड बँकेचे अजय रुपनर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# टेंभूर्णी मध्ये आम आदमी पार्टी कडून संविधान दिन व 11 वा पक्ष स्थापन दिवस साजरा

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभूर्णी येथे आम आदमी पार्टी पक्ष कार्यालयामध्ये संविधान दिन आणि आप पक्षाचा 11 वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. संविधान दिनाचे औचित्य साधून 26 नोव्हेंबर 2012 साली आप पक्ष स्थापन करण्यात आला होता. 10 वर्षात च आप हा राष्ट्रीय पक्ष झाला. दिल्ली मध्ये 70 पैकी 62 आमदार आणि पंजाब मध्ये 117 पैकी 92 आमदार आप चे असून त्या ठिकाणी अनेक लोकोपयोगी कामे सरकारने केली आहेत.महाराष्ट्रात देखील दिल्ली व पंजाब सारखे आम आदमी पार्टीचे सरकार आणणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन आपचे नेते अजित फाटके पाटील यांनी केले. यावेळी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच यावेळी 26/11 च्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या कार्यक्रमासाठी अजित फाटके पाटील, गगन गोडसे सर, योगेश शिंदे, अनंत घळके सर, महारुद्र तोडकर, योगेश नवले, स्वप्नील लोंढे, सोहम व्यवहारे, शिवाजी चव्हाण, अनिल राऊत, संतोष बागवाले इ. मान्यवर उपस्थित होते.

# अंकुश अवताडे मित्र परिवाराकडून सामाजिक उपक्रमांनी आ आवताडे यांचा वाढदिवस साजरा



**कुरुल (कटूसत्य वृत्त):-** वाढदिवस म्हटलं की हार, तुरे नारळ, जाहिरातबाजी, डिजिटल पोस्टर बॅनर असा गले लठ्ठ खर्च आलाच.. मात्र आपल्या नेत्याचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा करून भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष अंकुश आवताडे यांनी समाजासमोर नवा आदर्श ठेवला आहे.

मोहोळ तालुक्यातील विरवडे बुद्रुक येथे अंकुश भैय्या अवताडे मित्रपरिवार व भाजपा मोहोळ तालुका यांच्या वतीने भव्य नेत्र तपासणी, मोफत चष्मे वाटप, आयुष्यमान भारत कार्ड व नव मतदार नोंदणी अशा सामाजिक उपक्रमांनी आमदार समाधान आवताडे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. भाजप माजी जिल्हाध्यक्ष शंकर वाघमारे व प्रदेश निमंत्रित सदस्य संजीव खिलारे यांच्या शुभहस्ते या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी बोलताना संजीव खिलारे म्हणाले की, अंकुश भैय्या आवताडे मित्रपरिवाराकडून आमदार समाधान दादा आवताडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विरवडे पंचक्रोशीत साजरा केलेला उपक्रम हा अत्यंत स्तुत्य असून यामुळे राजकारणात व्यतिरिक्त देखील सामाजिक उपक्रम भारतीय जनता पार्टी करत असते हा संदेश समाजापर्यंत गेला.

दरम्यान या नेत्र शिबिरात ६०० नागरिकांनी सहभाग नोंदवून अनेक गरजूंना चष्मा वाटप करण्यात आले.

यावेळी युवा उद्योजक लहू तात्या अवताडे, माजी पंचायत समिती सदस्य हरिभाऊ आवताडे, येवली ग्रामपंचायत तथा पुण्याचे उद्योगपती शशिकांत जाधव, अभिजीत दळवी, विरवडे बुद्रुकचे सरपंच प्रतिनिधी बाबासाहेब अंकुश, सोसायटीचे चेअरमन प्रकाश बापू अवताडे, माजी उपसरपंच दिनकर बापू पवार, प्रकाश बाबा आवताडे, प्रमोद आप्पा अवताडे, ज्ञानेश्वर पाटील, महेश आवताडे, महेश कांबळे, प्रताप काका कांबळे, संतोष अवताडे, काका अवताडे यांच्यासह अंकुश भैय्या अवताडे मित्र परिवाराचे सदस्य व भाजपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिरकणी सखी मंच्याकडून न्यासाच्या प्रांगणात भव्य दीपोत्सव कार्यक्रम




**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ व न्यासाची सहयोगी संस्था असलेल्या हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने हिरकणी सखी मंच्याकडून त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त न्यासाच्या प्रांगणात भव्य दीपोत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. लख..! लख..!! दिव्यांनी न्यासाचा परिसर उजळून निघाला होता. दरम्यान न्यासाच्या प्रांगणात महाप्रसाद गृह समोरील कपिला गाय येथे दीप लाऊन भव्य दीपोत्सव साजरा करण्यात आला. सदरचा कार्यक्रम संस्थेचे आधारस्तंभ व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाला. कार्तिक पौर्णिमेला धार्मिकतेत महत्व असून यानिमित्त सालाबादाप्रमाणे न्यास व हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने दीपोत्सव या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. न्यासाच्या परिसरात विविध ठिकाणी दीपोत्सव करण्यात आले होते. त्रिपूर पौर्णिमेनिमित्त त्रिपूर वाती लावण्याची परंपरा असून, यादिवशी शंकराने तीन असुरांचा वध केला, अशीही आख्यायिका आहे. त्यामुळे यादिवशी त्रिपूर वात लावली जाते. म्हणून दीपोत्सव कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्तिकी एकादशीपासून सुरू झालेले तुळशी विवाह करण्याचा हा शेवटचा दिवस असतो. या दिवशी दीपोत्सवाला महत्व आहे.

म्हणूनच त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त न्यासाच्या प्रांगणात भव्य दीपोत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दरम्यान न्यासाच्या यात्री निवास येथे कोल्हापूर येथील भक्ती गंध सेवा प्रतिष्ठानच्या वतीने रांगोळी साकारून लक्षदिपोत्सव करण्यात आला. याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा अलकाताई भोसले, उपाध्यक्षा रत्नमाला मचाले, सचिवा अर्पिताराजे भोसले, खजिनदार स्मिता कदम, सुवर्णा घाडगे, स्वप्ना माने यांच्यासह न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे यांच्यासह पदाधिकारी, सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# भारतीय संविधान दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारतीय संविधान हे आपल्या लोकशाही व्यवस्थेचा मजबूत कणा आहे. स्वातंत्र्य, समता व सामाजिक न्याय या संविधानिक मूल्यांची जपणूक करून लोकशाही बळकट करण्याचा निर्धार संविधान दिनानिमित्त करूण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोलापूर शहरच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले .त्याप्रसंगी प्रदेश सचिव संतोष पवार ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी अल्पसंख्यांक प्रदेश कार्याध्यक्ष वसीम बुऱ्हाण जुबेर बागवान प्रांतिक सदस्य महेश निकंबे आनंद मुस्तारे युवक अध्यक्ष सुहास कदम दक्षिण विधानसभा अध्यक्ष अमीर शेख इरफान शेख अलमेराज आबादी राजे सोमनाथ शिंदे अनिल बानसोडे भास्कर अडकी यशराज डोळसे शशिकला कसपटे किरण ताई मोहिते मोनिका सरकार आदी पदाधिकारी उपस्थिती होते.

# भारतीय शास्त्रीय नृत्यकला अविष्काराबद्दल विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण होणे गरजेचे - नृत्यांगना कविता द्विवेदी

## पोखरापूर येथील जवाहर नवोदयमध्ये ओडिसी नृत्यकलेचे सादरीकरण संपन्न

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** विद्यार्थ्यांनी कोणतेही क्षेत्रात अत्युच्च प्रगती आणि नावलौकिक प्राप्त केला तरी आपली भारतीय संस्कृती,संगीत परंपरा आणि पारंपारिक नृत्य कला या न विसरता आत्मसात करायला हव्यात. भारतीय संगीत परंपरेला संपूर्ण जगात सन्मान आहे. संगीत आणि नृत्यकलेने व्यक्तिमत्व परिपूर्ण होते आणि आदर्शवत बनते. त्यामुळे संगीत आणि नृत्य क्षेत्राबद्दल आवड निर्माण होण्यासाठी ज्ञानदानाच्या क्षेत्रातील प्रत्येक घटकाने आपापल्या परीने प्रयत्नशील रहावे असे मत आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त ओडीसी नृत्यांगणा व नवी दिल्ली येथील संचारी फाउंडेशनच्या संचालिका कविता द्विवेदी यांनी नोंदवले. मोहोळ तालुक्यातील पोखरापूर येथील पी.एम.श्री जवाहर नवोदय विद्यालय येथे प्रख्यात नृत्यांगना कविता द्विवेदी यांच्या शास्त्रीय ओडिशी नृत्य कलाविष्काराचे आयोजन येथे शुक्रवार दि. २४ नोव्हेंबर रोजी सकाळी करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर महावितरणचे कार्यकारी अभियंता शितल वनारसे, प्राचार्य संजय कोठाडी, उपप्राचार्य गणेश आडोळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. तब्बल सव्वा तासाच्या शास्त्रीय नृत्य कलाविष्कारानंतर कविता द्विवेदी यांनी ओडिसी शास्त्रीय नृत्य कलेचे विविध प्रकार विषद केले. विद्यार्थिनींमधून कृष्ण आणि राधा यांच्यावरील जमुना कुडोनी या ओडिसी नृत्याला भरभरून प्रतिसाद मिळाला. यावेळी सूत्रसंचालिका अवनी परमार यांच्या संकल्पनेतून विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी प्रमुख पाहुण्या कविता द्विवेदी संवाद यांच्याशी मुक्त सवांद साधत शास्त्रीय नृत्य कलेविषयी विविध विषयावर चर्चा करत विद्यार्थ्यांच्या प्रश्नाला उत्तरे दिली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा . व्ही एन उकरडे, प्रा.श्रीकृष्ण देशमुख, प्रा. तुकाराम काळे सर, प्रा.वाणी यांच्यासह सर्व कर्मचारी बांधवांनी परिश्रम घेतले. यावेळी सूत्रसंचालन अवनी परमार यांनी केले कार्यक्रमात केले कार्यक्रमाचे आभार उप प्राचार्य गणेश आडोळे यांनी व्यक्त केले.



कविता द्विवेदी यांनी तब्बल ४२ देशांमध्ये आपली कला सादर केली असून त्यांना विवीध राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा कार्यक्रम स्पीकमॅके अंतर्गत नवोदय विद्यालय समिती पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने कार्यक्रम संपन्न करण्यात आला. या कार्यक्रमाच्या मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती व शास्त्रीय नृत्य संगीत व गीतांचे आवड निर्माण होईल हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश ठेवून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**- संजय कोठाडी,** प्राचार्य,
पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय सोलापूर

# गादेगांव चे सुपुत्र मुंबई उपनगरचे उपजिल्हाधिकारी



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** गादेगांव चे सुपुत्र मुंबई उपनगरचे उपजिल्हाधिकारी मा.सतिश बागल साहेब यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने "न्यू इंग्लिश स्कूल गादेगांव" येथे वृक्षारोपण व स्पर्धा परीक्षेची पुस्तके भेट देण्यात आली. सतिश बागल साहेब यांनी लोकसभागातून चालू असलेल्या हायस्कूलच्या इमारत बांधकामासाठी अतिशय मोठी मदत केली आहे. आज साहेबांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गणेश महादेव बागल यांनी शाळेला अनेक प्रकारची शोभेची झाडे भेट दिली. विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचाही सन्मान यावेळी करण्यात आला. एम.पी. एस.सी मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये चि.विशाल दादासाहेब सर्वदे यांची मंत्रालय सहाय्यक, मा. विद्यार्थिनी कु.दिव्या प्रमोद बागल हिची एअर होस्टेस(हवाई सुंदरी), चि.सुजल संजय शिंदे याची नॅशनल लेवलच्या ॲन्थेस्कॉलरशिप मध्ये राज्यात ५०९ क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल शाळेच्या व ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आले; यावेळी स्थानिक स्कूल समिती सदस्य सूर्यकांत(दाजी) बागल, बाळासाहेब बागल, हमाल माथाडी महामंडळाचे राज्याचे सरचिटणीस शिवाजीराव शिंदे, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश बागल, व्यवस्थापन समिती अध्यक्ष हणमंत बागल, रयतचे अजीव सदस्य कृष्णा रेडे सर, मुख्याध्यापक राजेंद्र रेपाळ सर, ग्रा.सदस्य रविंद्र पाटील, तानाजी बागल, संजय बागल, दादासाहेब सरवदे, नवनाथ बागल, अतुल फाटे, सिताराम बागल, संजय शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी शिक्षक संतोष गायकवाड सर यांनी प्रास्ताविक तर अशोक बागल सर यांनी आभार मानले. यावेळी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.!

# गोवा दारूसह सव्वीस लाखांचा मुद्देमाल जप्त

## माढा तालुक्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्य उत्पादन शुल्क विभागाने रविवारी माढा तालुक्यातील टेंभुर्णी व तांबवे परिसरात दोन ठिकाणी छापे टाकून देशी दारू व गोवा राज्यातील विदेशी दारू व दोन चारचाकी वाहनांसह 26 लाख पस्तीस हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.सविस्तर वृत्त असे की, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाला मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार त्यांनी 26 नोव्हेंबर रोजी माढा तालुक्यातील टेंभुर्णी- करमाळा बायपास पुलाच्या खाली पाळत ठेवून नंदू अजय मराठे वय 30 वर्षे, राहणार- निमगाव (टे) ता. माढा हा इसम त्याच्या महिंद्रा बोलेरो जीप क्रमांक टल45 अद 4759 या वाहनातून देशी दारू व गोवा राज्यातील विदेशी दारू वाहतूक करीत असल्याचे आढळून आल्याने त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आले. या गुन्ह्यात आरोपीच्या ताब्यातून देशी दारूच्या विविध ब्रँडच्या 180 मिली क्षमतेच्या 624 बाटल्या व गोवा राज्य निर्मित व महाराष्ट्र राज्यात विक्रीस प्रतिबंध असलेला मॅक डॉवेल नंबर वन व्हिस्की 180 मिली क्षमतेच्या 280 बाटल्या, रॉयल स्टॅग 180 मिली क्षमतेच्या 170 बाटल्या व एड्रियल क्लासिक व्हिस्की 750 मिली च्या 132 बाटल्या असा देशी-विदेशी दारूचा साठा व वाहन जप्त केले. या गुन्ह्यात भरारी पथकाने दहा लाख अठ्ठ्यांशी हजार आठशे अंशी रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून आरोपी विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला. त्याला सोमवारी मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, माढा यांचे न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यास दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.एक अन्य कारवाईत दुय्यम निरीक्षक, करमाळा विनायक जगताप यांनी निरीक्षक पंढरपूर यांच्या पथकासह तांबवे (मा. माढा) येथे अमोल वसंत खटके याच्या घराच्या पाठीमागील उसाच्या शेतामध्ये धाड टाकून त्या ठिकाणाहून दारू वाहतूक करण्यासाठी वापरण्यात येत असलेले महिंद्रा बोलेरो पिकअप वाहन क्रमांक टल 45 अक्र8548 व गोवा राज्य निर्मित विदेशी मद्याचा सहा लाख शहाण्णव हजार एकशे वीस रुपये किमतीचा दारू साठा जप्त केला आहे. या कारवाईत राज्य उत्पादन शुल्क विभागाने वाहनासह एकूण पंधरा लाख शेहेचाळीस हजार एकशे वीस रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला असून या गुन्ह्यातील प्रमुख आरोपी अमोल वसंत खटके हा फरार असून त्याचा शोध तपास अधिकारी विनायक जगताप करत आहेत. या दोन्ही कारवाईत राज्य उत्पादन शुल्क विभागाने आठ लाख पंच्यांशी हजार किंमतीची देशी- विदेशी दारू व दोन चार चाकी वाहन असा एकूण सव्वीस लाख पस्तीस हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई अधीक्षक नितीन धार्मिक यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी निरीक्षक भरारी पथक सुरेश झगडे, निरीक्षक पंढरपूर किरण बिरादार, दुय्यम निरीक्षक शिवकुमार कांबळे, विनायक जगताप, सहायक दुय्यम निरीक्षक जीवन मुंढे, जवान अशोक माळी, नंदकुमार वेळापुरे, अण्णा कर्चे, अनिल पांढरे, विकास वडविले, विजयकुमार शेळके, प्रकाश सावंत व वाहन चालक दीपक वाघमारे व रामचंद्र मदने यांच्या पथकाने पार पडली.